# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत शासन

सोमवार, मे २४, १९९९/ज्येष्ठ ३,शके १९२१


स्वतंत्र संकलन फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार – ब

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि पत्रक यांमध्ये प्रसिध्द केलेले नियम व आदेश यांच्याव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**ग्रामविकास व जलसंधारण बिभाग**

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२, दिनांक २४ मे १९९९

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१.**

क्र. सेप्रआ-११९४/सीआर-१५१२/१३, महाराष्ट्र जिल्हा परिषदा, व पंचायत समित्या अधिनियम १९६१ (सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम ५) यांच्या कलम २७४, (२), खंड (एकोणचाळीस) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या आणि त्याबाबतीत महाराष्ट्र शासनाला समर्थ करणा-या इतर सर्व शक्तीचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे, महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा सेवाप्रवेशोत्तर परीक्षा नियम १९८५ मध्ये सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे. हे नियम उक्त कलम २७४ च्या पोट - कलम (3) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे यापूर्वी प्रसिध्द करण्यात आले होते.

१ या नियमांना महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हासेवा सेवाप्रवेशोत्तर परीक्षा (सुधारणा) नियम १९९९, असे म्हणता येईल.

२. महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा सेवाप्रवेशोत्तर परीक्षानियम, १९८५ (यात यापुढे ज्यांचा निर्देश " मुख्य नियम " असा करण्यात आला आहे) यांच्या नियम ४ च्या उप-नियम (३) मधील खंड (ब) वगळण्यात यावा.

३. मुख्य नियमांच्या नियम ५ मधील सध्याचा उप-नियम, (३) ऐवजी पुढील, उप - नियम दाखल करण्यात यावा. -

(३) परिषद कर्मचारी नियम ४ मध्ये विहित केलेल्या कालावधीमध्ये व संधीमध्ये परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास त्याच्या आधी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या त्या पदाच्या संवर्गातील सर्व परिषद कर्मचा-यांबरोबरची त्याची जेष्ठता त्याला गमवावी लागेल आणि अशा ज्या परिषद कर्मचा-यानंतरचा जेष्ठताक्रम त्याला देण्यात येईल त्या परिषद कर्मचा-यांना जेष्ठ असणार आणि त्याच्या नंतर परंतू नियम ४ मध्ये विहित केलेल्या कालावधीमध्ये व संधीमध्ये परीक्षा उत्तीर्ण होणार कर्मचारी त्याला ज्येष्ठ असतील."

४. मुख्य नियमांच्या नियम ६ मध्ये उप- नियम (२) मधील सध्याचा नियम वगळण्यात यावा.

५ मुख्य नियमांच्या नियम ६ नंतर पुढील नियम दाखल करण्यात यावा. :—

" ६ अ परीक्षेला बसण्यासाठी संधी - नियम ५ च्या तरतुदीस अधीन राहून परिषद कर्मचा याला परीक्षेस बसण्यासाठी कितीही वेळा संधी मिळू शकेल. "

६. मुख्य नियमांच्या नियम ७ मधील " किंवा इंग्रजी " हा मजकूर वगळण्यात यावा. :-

७. मुख्य नियमांच्या नियम ९मध्ये --

(अ) सध्याचे उप-नियम (१) ऐवजी पुढील उप-नियम दाखल करण्यात यावा :-

" (१) परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी प्रत्येक प्रश्नपत्रिकेमध्ये एकूण गुणाच्या ४० टक्के गुण आवश्यक असतील. "

(ब) उप-नियम (३) मधील " किंवा त्याने एकूण गुणांच्या ५० टक्के किंवा त्याहून अधिक गुण मिळविले असतील परंतू एका विषयात तो ३५ टक्के गुण मिळवू शकला नसेल " हा मजकूर वगळण्यात यावा.

८. मुख्य नियमांस जोडलेल्या परिशिष्ट "अ " मध्ये --

(अ) सध्याचे नोंद क्रमांक (एक) व (दोन) ऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात यावा :-

" (एक)जिल्हातांत्रिक सेवा (वर्ग-तीन) (कृषि)

(दोन) जिल्हा तांत्रिकसेवा (वर्ग-तीन) (पशुसंवर्धन) द्वितीय व तृतीय श्रेणी

(ब) सध्याचे नोंद क्रमांक (चार), (पाच) (अकरा) व (पंधरा) हा मजकूर वगळण्यात यावा.

(क) सध्याचे नोंद क्रमांक (बारा) ऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात यावा.:-

" (बारा) जिल्हा सेवा (वर्ग-तीन) (दुय्यम पशुसंवर्धन) प्रथम व द्वितीय श्रेणी,"

९. मुख्य नियमांस जोडलेल्या परिशिष्ट "ब " च्या खालील तक्त्यामध्ये " दोन तक्त्यांसह) " या नोंदीसमोर "स्तंभ २ मध्ये " विषय या शिर्षाखालील उप नोंद " (चार) महाराष्ट्र जिल्हा परिषद, सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम, १९६६" या ऐवजी पुढील उप नोंद दाखल करण्यात यावी. :--

"(चार) महाराष्ट्र सर्वसाधारण, भविष्यनिर्वाह निधी नियम."

१०. मुख्य नियमांस जोडलेल्या परिशिष्ट "क" मधील अर्जाच्या नमुन्यामधील नोंद क्रमांक ७ हा मजकूर वगळण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

चि.चं. पाटील
शासनाचे उपसचिव.

टीप - महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा सेवाप्रवेशोत्तर परीक्षा नियम, १९८५ ह्या यापूर्वी महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण, भाग चार - ब मध्ये दिनांक १ एप्रिल १९९२ च्या मराठी पृ. ६०० वर प्रसिध्द झालेली शासन अधिसूचना क्रमांक संप्रप-१५९१/सीआर-१५८/९१/१३, दि.१ एप्रिल १९९२ अन्वये शेवटी सुधारणा करण्यात आली होती.

महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा सेवाप्रवेशोत्तर परीक्षा नियम, १९८५ यातील ही १९९९ मधील पहिली सुधारणा आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद, जिल्हा सेवा सेवा
**प्रवेशोत्तर परीक्षा नियम, १९८५ मध्ये सुधारणा.**

**महाराष्ट्र शासन**
**ग्रामविकास व जलसंधारण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक सेप्रआ-११९४/सीआर-१५१२/१२,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक - २४ मे १९९९.**

वाचा - शासकीय अधिसूचना क्रमांक सेप्रआ-११९४/सीआर-१५१२/१३, दिनांक - २४ मे १९९९.

**शासन निर्णय .**

वरील संदर्भात निर्देशिलेल्या शासकीय अधिसुचनेस हरकती व सूचना प्राप्त झाल्या नाहीत. तरी शासन असा निर्देश देते की सोबत जोडलेली मराठी व इंग्रजी अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात अंतिमरित्या प्रसिध्द करण्यात यावी.

२. संचालक, शाकीय मुद्रण व लेखनसामग्री, मुंबई यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी या अधिसूचनेच्या (मराठी व इंग्रजी) पुरेसा साठा अधिका-यांच्या मागणीनुसार पुरविण्यासाठी व जनतेस विक्रीसाठी उपलब्ध करून ठेवावा.

३. व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई यांना विनंती करण्यात येते की, सोबत जोडलेल्या तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे अदिसूचनेच्या मराठी व इंग्रजी प्रती त्वरीत निर्गमित करण्याची व्यवस्था करावी.

४. या अधिसूचनेच्या छपाईचा खर्च (मागणी क्रमांक एल-१६) "३४५१ सेक्रेटरिएट आर्थिक सेवा, ०९०- सेक्रेटरिएट ग्रामविकास व जलसंधारण विभाग कार्यालयीन खर्च (३४५१००८२) " या लेखाशिर्षांतर्गत प्रपत्र लेख्यांच्या स्वरूपात खर्ची घालण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

चिं.च.पाटील,
शासनाचे उपसचिव.

जा.क्र./साप्रवि/आस्था-७/आरआर/११७/०६
सामान्य प्रशासन विभाग, जि.प. जळगांव
दि. २२/ २ /२००६

१२५
१६।३।०६

प्रत - म. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, जळगांव यांचे स्विय सहाय्यक यांचेकडेस माहितीसाठी.
प्रत - म. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, जळगांव यांचे स्विय सहाय्यक यांचेकडेस माहितीसाठी.

२०५०

प्रत - माहितीसाठी व उचित कार्यवांहीसाठी रंवाना.

१) सर्व खाते प्रमुख जिल्हा परिषद, जळगांव.
२) सर्व गट विकास अधिकारी पचायत समिती जिल्हा जळगांव.
३) सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी एकात्मिक बाल विकास सेवा योजना जिल्हा जळगांव.
४) सर्व उप अभियंता जि. प. बांधकाम /सिंचन/यांत्रिकी उपविभाग जिल्हा जळगांव.
५) सर्व वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र जिल्हा जळगांव.
६) प्राचार्य जि.प. विद्यानिकेतन व कनिष्ठ महाविद्यालय, जळगाव.
७) साप्रवि आस्था-१ ते १२, रवका -२, अधिक्षक, लघुलेखक,मुलकी, नियोजन, परिषद, जि.प. जळगांव.

कृषी विभाग,जि.प.जळगांव
आवक क्र.- ३१७
जावक क्र.-
दिनांक 13 MAR 2006
कार्य. अधि.-
अधि.-
कृ.अ.- कृ.वि.अ.

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, जळगांव (करिता)

(4) (5)

क्र. परीक्षा/१९९२/२०४१/प्र. ७०१/०९,
ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक १६ नोव्हेंबर १९९२.

विभागीय आयुक्त [सर्व]

विषय:- महाराष्ट्र जिल्हा परिषद [जिल्हा सेवा] सेवाप्रवेशोत्तर परीक्षा. संधीबाबत.

ज्या जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमीत झालेल्या नाहीत त्यांना सदर परीक्षेस बसण्याची आवश्यकता नाही असा खुलासा शासनाच्या दि. २७जुलै १९९१ च्या इएक्सएम-१०८८/प्र. ५७६/०९, येथील पत्रान्वये केला होता. त्यानंतर शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या दि. ५/२/१९९० च्या प्रा. नि. सं. २३८२/प्र. ६६/८२/भाग-२/१३-अ, च्या निर्णया प्रमाणे वेळोवेळी जिल्हा परिषदेनी आपापल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत सेवा नियमीत करण्याचे आदेश काढले असतील. अशा कर्मचाऱ्यांना सेवा प्रवेशोत्तर परीक्षा उत्तीर्ण होणेसाठी विहीत मुदत व संधीबाबत खालील खुलासा करण्यात येतो.

२. दि. ५ फेब्रुवारी १९९० नंतर दि. २० जून १९९० पूर्वी ज्यांच्या सेवा नियमीत करण्याचे आदेश निर्गमित झाले असतील त्यांच्या बाबतीत दि. २० जून १९९०च्या क्र. इएक्सएम-१४९०-प्र. २२/०९/च्या परिपत्रकान्वये ऑक्टोबर १९९० मध्ये घेण्यात आलेली परीक्षा ही पहिली संधी समजण्यात यावी. सन १९९१ मध्ये परीक्षा झाली नाही. तरी ऑक्टोबर १९९२ मध्ये होणारी परीक्षा ही दुसरी संधी समजण्यात यावी.

३. नियमानुसार चार वर्षांच्या मुदतीत सदरपरीक्षा उत्तीर्ण व्हावयाची आहे. या हेतूसाठी १९९१ हे वर्ष जमेस धरण्यात येऊ नये.

४. यापुढेही एखाद्या वर्षी काही कारणामुळे परीक्षा होऊ शकली नाही तर मुदतीसाठी ते वर्ष व संधीच्या बाबतीत त्या वर्षी न झालेल्या परीक्षेची संधी विचारात घेऊनये.

५. दि. २०जून १९९० नंतर ज्यांची सेवा नियमीत झाली असेल किंवा होईल त्यांच्याबाबतीत सेवा नियमीत करण्याच्या आदेशानंतरपहिल्याने घोषीत होणारी परीक्षा ही पहिली संधी समजण्यात यावी.

सही/-xxx

[र. ग. देशपांडे]
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

सर्व जिल्हा परिषदांचे
मुख्य कार्यकारी अधिकारी,

अत्यंत महत्वाचे

जा. क्र. साप्रवि/अस्था-७/आरआर/३५६/९
सामान्य प्रशासन विभाग, जि. प. जळगांव
दिनांक १२/५/१९९९

प्रति,

म. खाते प्रमुख [सर्व] जिल्हा परिषद, जळगांव

म. गट विकास अधिकारी, पंचायत समिती [सर्व] जि. जळगांव.

विषय:- महाराष्ट्र जिल्हा परिषद [जिल्हा सेवा] सेवाप्रवेशोत्तर परिक्षा........

विहित संधीत उत्तीर्ण न झालेल्या कर्मचा-यांच्या वेतनवाढी रोखणे बाबत..

संदर्भ :- इकडील पत्र क्र. साप्रवि/अस्था-७/आरआर/३५६/९५ दिनांक १५/१२/९५

कृपया संदर्भीय पत्राचे अवलोकन करावे. संदर्भीय पत्रान्वये सेवाप्रवेशोत्तर परीक्षा कोणत्या संवर्गातील कर्मचा-यांना देणे बंधनकारक आहे, उत्तीर्ण होण्यासाठी कालावधी व संधी, परिक्षा उत्तीर्ण न होण्याचे परिणाम इ. संपूर्ण तपशीलवार माहिती देण्यात आलेली आहे.

सदर परिपत्रकाच्या अनुषंगाने सर्व कार्यालय प्रमुखांना सूचित करण्यात येते की, महाराष्ट्र जिल्हा परिषद [जिल्हा सेवा] सेवाप्रवेशोत्तर परिक्षा १९८५ मधील नियम ४ नुसार परिषद कर्मचा-याने सेवाप्रवेशोत्तर परिक्षा चार वर्षाच्या कालावधीत व तीन संधीत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. नियम ५ [१] व नुसार चार वर्षात व तीन संधीत सेवाप्रवेशोत्तर परिक्षा उत्तीर्ण न करणा-या परिषद कर्मचा-याची तो धारण करीत असलेल्या पदाच्या वेतनश्रेणीत पुढील वेतनवाढ दिली जाणार नाही. अशा रितीने रोखून ठेवण्यात आलेल्या वेतनवाढी नियम ५[२] नुसार तो कर्मचारी सेवा प्रवेशोत्तर परिक्षा उत्तीर्ण झाल्याच्या दिनांकापासून देय होतील आणि कोणतीही वेतनवाढ रोखून न धरल्याचे समजून पुढील सर्व वेतनवाढी देय होतील मात्र पूर्वीच्या कालावधीतील वेतनवाढीची फरकाची थकबाकी त्यांना अनुज्ञेय असणार नाही.

तरी जे कर्मचारी दिनांक २०/१/१९८६ रोजी १५ वर्षे अखंड सेवा पूर्ण करीत असतील किंवा आजअखेर वयाची ४५ वर्षे पूर्ण करीत असतील अश कर्मचा-यांच्या व्यतिरिक्त चार वर्षात किंवा तीन संधीत जे कर्मचारी सदर परिक्षा उत्तीर्ण झालेले नाहीत अशा कर्मचा-यांच्या वेतनवाढी ते सद परिक्षा उत्तीर्ण होईपावेतो अथवा परिक्षा [illegible]पासून सूट ~~मिळवेपर्यंत~~===== मिळेपर्यंत विनाविलंब रोखण्यात

पंचायत समिती [illegible]
आवक नंबर:-
दिनांक- 19 MAY 1999
संबंधीत शाखा-
२९१
अधिक्षक / ग. वि. अधिकारी



1486
99

यावयात व अशी कार्यवाही करुन तसा सविस्तर अहवाल इकडेस सादर करावा.

जे कर्मचारी विहित संधीत व वर्षात परिक्षा उत्तीर्ण नाहीत व त्या कर्मचा-यांना पुढील वेतनवाढी मंजूर करुन त्याप्रमाणे वेतन दिले जात असेल अशा कर्मचा-यांना जादा झालेल्या प्रदानाची संपूर्ण जबाबदारी संबंधित कार्यालय प्रमुखाची राहील याची नोंद घ्यावी.

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, जळगांव करिता.

प्रत माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी :-

१] म. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा जळगांव
२] म. प्रमुख कृषी अधिकारी, प्रशिक्षण व भेट योजना, जळगांव
३] म. बालविकास प्रकल्प अधिकारी, ए. बा. वि. से. यो. [सर्व] जि. जळगांव
४] म. उप अभियंता, जि. प. बांधकाम/सिंचन/ग्रा. पा. पु. /भू-जल सर्वे. वि. यंत्रणा उपविभाग [सर्व] जि. जळगांव
५] म. वैद्यकीय अधिकारी, प्राथ. आरोग्य केंद्र [सर्व] जि. जळगांव
६] म. प्राचार्य, जि. प. विद्यानिकेतन व कनिष्ठ महाविद्यालय, जळगांव
७] साप्रविभाग/ आस्थापना २, ४, ८

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, जळगांव करिता.

ग./११५

याव्यात व अशी कार्यवाही करुन तसा सविस्तर अहवाल इकडेस सादर करावा.

जे कर्मचारी विहित संधीत व वर्षात परिक्षा उत्तीर्ण नाहीत व त्या कर्मचा-यांना पुढील वेतनवाढी मंजूर करुन त्याप्रमाणे वेतन दिले जात असेल अशा कर्मचा-यांना जादा झालेल्या प्रदानाची संपूर्ण जबाबदारी संबंधित कार्यालय प्रमुखाची राहील याची नोंद घ्यावी.

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, जळगांव करिता.

प्रत माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी :-

१] म. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा जळगांव
२] म. प्रमुख कृषी अधिकारी, प्रशिक्षण व भेट योजना, जळगांव
३] म. बालविकास प्रकल्प अधिकारी, ए. बा. वि. से. यो. [सर्व] जि. जळगांव
४] म. उपअभियंता, जि. प. बांधकाम/सिंचन/ग्रा. पा. पु. /भू-जल सर्वे. वि. यंत्रणा उपविभाग [सर्व] जि. जळगांव
५] म. वैद्यकीय अधिकारी, प्राथ. आरोग्य केंद्र [सर्व] जि. जळगांव
६] म. प्राचार्य, जि. प. विद्यानिकेतन व कनिष्ठ महाविद्यालय, जळगांव
७] साप्रविभाग/ अस्थापना २, ४, ८

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, जळगांव करिता.

ग./११५ -6-

कार्यासन दिली.

क्र. साप्र वि-आस्था-७-आरआर-३५६-९५
जि. प. जळगांव दिनांक १५/१२/९५.

प्रति,
सर्व खाते प्रमुख, ६५०९
जिल्हा परिषद, जळगांव.

विषय:- महाराष्ट्र जिल्हा परिषद[ जिल्हा सेवा ] नियम १९८५

संदर्भ:- शासन ग्रा. वि. वि. अधिसुचना क्र. डीएसबी/१०८५/सीआर/२२१/१३ दि. २०/१/१९८६.

असे निदर्शनास आले आहे वेगवेगळया संवर्गाच्या जिल्हा परिषद कर्मचारी यांना संदर्भीय शासन ... अधिसुचनेनुसार महाराष्ट्र जिल्हा परिषद[ जिल्हा सेवा ] सेवा प्रवेशोत्तर परीक्षा[ कनिष्ठ अर्हता ] ही परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक असतांनाही या बाबीकडेल खाते प्रमुखांनी गांभीर्यपुर्ण लक्ष दिले नाही सदर नियम दि. २०/१/१९८६ पासुन लागु करणेत आले आहे. त्यात परीक्षा उत्तीर्ण न झाले बद्दल होणारे परिणाम व त्यावर करावयाची कार्यवाही याचा उहापोह करणेत आलेला आहे.

आपणांस लागलीच संदर्भासाठी जिल्हा सेवेतील खालील संवर्गात काम करणा-या कर्मचारी यांना सदरची परीक्षा उत्तीर्ण होण्याचे बंधनकारक आहे त्याचा तपशिल खालील प्रमाणे दिलेला आहे.

| अ. नं. | सेवेचा प्रकार | पदांची नावे. |
|---|---|---|
| १. | जिल्हा तांत्रीक सेवा वर्ग-३ [कृषी | श्रेणी-१] कृषी अधिकारी<br>श्रेणी-२] विस्तार अधिकारी कृषी. |
| २. | जिल्हा तांत्री सेवा वर्ग-३[पशुसंवर्धन] | श्रेणी-३] सहाय्यक पशुधन विकास अधिकारी |
| ३. | जिल्हा तांत्रीक सेवा वर्ग-३[शिक्षण] | श्रेणी-३] विस्तार अधिकारी शिक्षण<br>श्रेणी-३] कनिष्ठ विस्तार अधिकारी शिक्षण<br>श्रेणी-३] मुख्यसेविका. |
| ४. | जिल्हा तांत्रीक सेवा वर्ग-३[आरोग्य]<br>श्रेणी-३-[१] कनिष्ठ आरोग्य अधि.<br>२] कनिष्ठ. वि. अ.<br>३] वरिष्ठ आयु. वैद्य.<br>४] वरिष्ठ युनानी हकीम<br>५] कुष्ठरोग तंत्रज्ञ<br>६] आर्टीष्ट फोटोग्राफर<br>७] गट पातळीवरील पर्यवेक्षीका. | श्रेणी-१ वरिष्ठ वैद्यकिय अधिकारी<br>श्रेणी-१ सहाय्यक वैद्यकिय अधिकारी<br>श्रेणी-२] १] वैद्यकिय अधिकारी<br>२] वैद्यकिय अधिकारी[ साथरोग]<br>३] विस्तार अधिकारी[आरोग्य] |
| ५. | जिल्हा तांत्रीक सेवा वर्ग-३ [स्थापत्य] | श्रेणी-३- कनिष्ठ अभियंता विस्तार अधि. बांधकाम<br>श्रेणी-३- सहाय्यक विस्तार अधि. [बांधकाम] |

पंचायत समिति ... 1 JAN 1996 ... अधिकारी.

AE (३०)

सर्व शाखाप्रमुखांनी ... आवश्यक



//२//

| | |
|---|---|
| ६. जिल्हा सेवा वर्ग-३[लिपीकवर्गीय] | श्रेणी-३ वरिष्ठ सहाय्यक[प्रशासन] |
| ७. जिल्हा सेवा वर्ग-३[सांख्यिकी] | श्रेणी-२ विस्तार अधिकारी [सांख्यिकी] |
| ८. जिल्हा तांत्रीक सेवा वर्ग-३ कार्यवाही आणि ग्राम विस्तार | श्रेणी-२ १] विस्तार अधि. [ग्रापं]<br>२] ग्राम विकास अधि. |
| ९. जिल्हा सेवा वर्ग-३ [लेखा] | श्रेणी-२] उपलेखापाल<br>श्रेणी-३ वरिष्ठ सहा[लेखा] |
| १०. जिल्हा तांत्रीक सेवा वर्ग-३ [समाज कल्याण] | श्रेणी- विस्तार अधिकारी [स. क.] |
| ११. जिल्हा सेवा वर्ग-३ [दुय्यम कृषी] | श्रेणी- कृषी सहाय्यक. |
| १२. जिल्हा सेवा वर्ग-३[दु. पशुसंवर्धन] | श्रेणी- १] पशुधन पर्यवेक्षक<br>२] कनिष्ठ पशु वैद्यकिय सहाय्यक.<br>३] व्रणोपचारक. |
| १३. जिल्हा सेवावर्ग-३[दु. शिक्षण] | श्रेणी- १] शिक्षण सहाय्यक. |
| १४. जिल्हा सेवावर्ग-३[दु. शिक्षण] | श्रेणी-२ - कनिष्ठ शिक्षण सहाय्यक. |
| १५. जिल्हा सेवा वर्ग-३[दुय्यम स्थापत्य] | श्रेणी-१] सहाय्यक कनिष्ठ अभियंता |
| १६] जिल्हा सेवावर्ग-३ [दुय्यम कार्यकारी आणि ग्राम विस्तार] | श्रेणी- १] ग्रामसेवक. |
| १७] जिल्हा सेवा वर्ग-३ [दुय्यम लिपीक वर्गीय] | श्रेणी- १ १. कनिष्ठ सहाय्यक<br>२. भांडार पाल.<br>३. भांडार सहाय्यक<br>४. संगणक. |
| १८] जिल्हा सेवावर्ग-३ [दुय्यम लिपीक वर्गीय] | श्रेणी-२ कार्यालय सहाय्यक. |
| १९. जिल्हा सेवा वर्ग-३ [ दुय्यम समाज कल्याण ] | श्रेणी-१- ग्रामसेवक आणि वरिष्ठ समा. कल्याण. |
| २०. जिल्हा सेवा वर्ग-३ [दुय्यम समाज कल्याण ] | श्रेणी-२ समाज कल्याण सहाय्यक. |

वरील नमूद केलेल्या संवर्गात जे कर्मचारी नेमलेल्या दिवशी अगर त्यानंतर जिल्हा परिषद सेवेत नियमीत आस्थापनेवर काम करीत असतील त्यांना सदरची परिक्षा पास होणे आवश्यक आहे.

२] परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी कालावधी व संधी.

Imp

अ] दि. २०/१/८६ पुर्वीची नियुक्ती असलेल्या सेवकांना दि. २०/१/८६ पासून चार वर्षाच्या कालात तीन संधी मध्ये परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

ब] दि. २०/१/८६ नंतर जिल्हा सेवेत नियुक्त केलेल्या कर्मचारी यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून चार वर्षांच्या कालात तीन संधी मध्ये परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. एखाद्या वर्षात अन्य कारणाने परीक्षा न झाल्यास एकूण कालावधी मधुन ते वर्ष वगळण्यात येईल. तसेच विशिष्ट अपवादात्मक परिस्थितीत योग्य त्या कारणासाठी

//३//

वरील संधी शिवाय दोन संधी देण्याचा किंवा दोन वर्षाचा कालावधी वाढवुन देण्याचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आहे.

ब] परीक्षा उत्तीर्ण न होण्याचे परिणाम.

१] विहीत मुदतीत व संधी मध्ये जे कर्मचारी परीक्षा उत्तीर्ण होणार नाहीत ते कर्मचारी परीक्षा उत्तीर्ण होई पर्यंत ते पदावर सेवेत आहे. त्या पदावर कायम केले जाणार नाही. तसेच त्या पदावरील वेतन श्रेणीतील पुढील वेतन वाढी मंजुर केल्या जाणार नाहीत.

मात्र असा कर्मचारी उपलब्ध झालेल्या संधीत पास झाल्यावर त्याचा मागील स्थगित करण्यात आलेल्या वेतनवाढ पुढील वेतन वाढीच्या देय दिनांका रोजी देय होतील. मात्र वेतन वाढ बंद केलेल्या तारखे पासुन पुढील पुढील वेतन वाढ देय झालेल्या दिनांका पर्यंतच्या फरकांची रक्कम अनुज्ञेय रहाणार नाही.

२] दि. २०/१/८६ नंतर जे कर्मचारी सरळ सेवेने नेमणुकीत आले आहेत अथवा तात्पुरती स्वरूपात नेमलेल्या हंगामी कर्मचाऱ्यांना त्यांच्या सेवा सलग करतांना त्यांना सलग सेवेची तारीख २०/१/८६ नंतरची देण्यात आली असेल तर ते कर्मचारी जर विहीत केलेल्या मुदतीत व विहीत संधीमध्ये परीक्षा उत्तीर्ण झाले नाहीत तर ते सेवक जिल्हा परिषद सेवेतुन सेवा मुक्त करण्यास पात्र ठरतील.

क] परीक्षा उत्तीर्ण होण्यापासुन सुट.

१] दि. २०/१/८६ रोजी अथवा त्यानंतर वयाची ४५ वर्षे पुर्ण झालेल्या अथवा होणाऱ्या कर्मचाऱ्यांना परीक्षा उत्तीर्ण होण्यापासुन सुट मिळेल.

२] दि. २०/१/८६ रोजी सदर संवर्गात १५ वर्षे सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांना परीक्षा उत्तीर्ण होण्यापासुन सुट मिळेल. [शासन ग्रा. वि. वि. एपीटी/१९९३/१७४०/सीआर/७८७/१३ दि. २/१/९३]

वरील सर्व बाबींची खाते प्रमुखांनी प्रत्यक्षपणे आढावा घेऊन कार्यवाही करावी. तसेच परीक्षे बाबतचे वरील नियम संबंधीत कर्मचारी यांच्या प्रत्यक्ष नजरेस आणुन त्याबाबत नोंद घेतले बाबत त्यांची सवाक्षरी घेणे आवश्यक आहे. कोणत्याही कर्मचाऱ्याने त्यांच्या वर कार्यवाही झालेवर त्याच्या सदर बाब कार्यालयाने नजरेस आणुन दिली नाही असा तक्रारीस वाव देता कामा नये.

सोबत ३ प्रपत्र जोडली आहेत. त्यात आपल्या अधिनस्त असलेल्या संवर्गाची माहिती दि. ३१/१२/९५ अखेर सादर करावी.

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद जळगांव करिता.

जा. नं. सापुवि-अस्था-७-आरआर- -९४
जि. प. जळगांव दिनांक /१२/९५.

प्रति,
खाते प्रमुख[सर्व] जि. प. जळगांव.
प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जळगांव.
गट विकास अधिकारी पंचायत समिती[सर्व] जि. जळगांव.
प्राचार्य/प्रशिक्षण अधिकारी आरोग्य व प्रवण केंद्र जळगांव.
मुख्य कृषी अधिकारी प्रशिक्षण व भेट योजना जळगांव / उपविभागीय कृषी अधिकारी प्र. शिक्षण व भेट योजना पाचोरा/अमळनेर जळगांव.
प्राचार्य जि. प. शिक्षण निकेतन जळगांव
बाल विकास प्रकल्प अधिकारी एका. बाल विकास सेवा योजना [सर्व] जि. जळगांव.
वैद्यकिय अधिकारी प्राथ. आरोग्य केंद्र, [सर्व] जि. जळगांव.
उप अभियंता बांध./सिंचन/भु-जल [सर्व] उपविभाग जि. जळगांव.
सापुवि-अस्था-१/२/४/७/८/१० जि. प. जळगांव.
त्यांनी माहिती त्याचे खाते प्रमुखांमार्फत [illegible] ... कडेस सादर करावी.

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, जळगांव करिता.

[illegible]

क्र. परीक्षा/१९९२/२०४१/प्र. ७०१/०९,
ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक १६ नोव्हेंबर १९९२.

विभागीय आयुक्त [सर्व]

विषय:- महाराष्ट्र जिल्हा परिषद [जिल्हा सेवा] सेवाप्रवेशोत्तर परीक्षा.
संधीबाबत.

ज्या जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमीत झालेल्या नाहीत त्यांना सदर परीक्षा देण्याची आवश्यकता नाही असा खुलासा शासनाच्या दि. २७जुलै १९९१ च्या झेडपीएस-१०८८/प्र. ५७६/०९, च्या पत्राने केला होता. त्यानंतर शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या दि. ५/२/१९९० च्या प्रा. नि. सं. २३८२/प्र. ६६/८२/भाग-२/१३-अ, च्या निर्णयानुसार वेळोवेळी जिल्हा परिषदेनी आपापल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत सेवा नियमीत करण्याचे आदेश काढले असतील. अशा कर्मचाऱ्यांना सेवा प्रवेशोत्तर परीक्षा उत्तीर्ण होणेसाठी विहीत मुदत व संधीबाबत खालील खुलासा करण्यात येतो.

२. दि. ५ फेब्रुवारी १९९० नंतर दि. २० जून १९९० पूर्वी ज्यांच्या सेवा नियमीत करण्याचे आदेश निर्गमीत झाले असतील त्यांच्या बाबतीत दि. २० जून १९९०च्या क्र. झेडपीएस-१४९०-प्र. २२/०९/च्या परिपत्रकान्वये ऑक्टोबर १९९० मध्ये घेण्यात आलेली परीक्षा ही पहिली संधी समजण्यात यावी सन १९९१ मध्ये परीक्षा झाली नाही तरी ऑक्टोबर १९९२ मध्ये होणारी परीक्षा ही दुसरी संधी समजण्यात यावी.

३. नियमानुसार चार वर्षांच्या मुदतीत सदर परीक्षा उत्तीर्ण व्हावयाची आहे. या हेतूसाठी १९९१ हे वर्ष जमेस धरण्यात येऊ नये.

४. यापुढेही एखाद्या वर्षी काही कारणामुळे परीक्षा होऊ शकली नाही तर मुदतीसाठी ते वर्ष व संधीच्या बाबतीत त्या वर्षी न झालेल्या परीक्षेची संधी विचारात घेऊ नये.

५. दि. २०जून १९९० नंतर ज्यांची सेवा नियमीत झाली असेल किंवा होईल त्यांच्याबाबतीत सेवा नियमीत करण्याच्या आदेशानंतर पडिल्याने घोषीत होणारी परीक्षा ही पहिली संधी समजण्यात यावी.

सही/-xxx

[र. ग. देशपांडे ]
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

सर्व जिल्हा परिषदांचे
मुख्य कार्यकारी अधिकारी,



//२//

28 APR 2008

क्रमांक :- सेवाजे- ३००८/ प्र.क्र.३९/ आस्था-१०
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
मंत्रालय, मुंबई:-३२.
दिनांक :- २२ एप्रिल, २००८.

प्रति,

१) सर्व विभागीय आयुक्त,
सर्व विभाग:

२) उपायुक्त (आस्था)
सर्व विभागीय आयुक्त कार्यालये

विषय :- <u>महाराष्ट्र विकास सेवा वर्ग-२ पदावरील निवडीने नेमणूका</u>
महाराष्ट्र जिल्हा परिषदा (जिल्हा सेवा) सेवा प्रवेशोत्तर परिक्षा नियम,१९८५ नुसार सेवा ज्येष्ठता ठरविणेबाबत.

संदर्भ :- शासन पत्र समक्रमांक दि.१६ फेब्रुवारी, २००८.

उपरोक्त विषयाबाबत शासनाचे संदर्भाधीन पत्र कृपया पहावे. याच विषयाबाबत या विभागाच्या पत्र क्र.एपिटी ३६०४/ प्र.क्र.२६७८/ आस्था-८, दि.३० एप्रिल, २००४ ची प्रत सोबत जोडली आहे.

२. सदर पत्रात नमूद केल्याप्रमाणे कर्मचा-यांच्या सेवाज्येष्ठता वेळीच सुधारीत करणे आवश्यक आहे. असे असतांना सेवाजेष्ठता याद्या सुधारीत न करता चुकीच्या पध्दतीने पदोन्नती देण्याची कार्यवाही काही जिल्हा परिषदांनी केलेली आहे. यामुळे पदोन्नतीमध्ये जेष्ठता डावलली गेल्याच्या तक्रारी कर्मचा-यांकडून प्राप्त होत आहेत. विभागीय आयुक्त कार्यालयांनी अशा प्रकरणांचा आढावा घेवून नियमाप्रमाणे सेवाज्येष्ठता व त्याप्रमाणे पदोन्नत्या दिल्या जातील याकडे विशेष लक्ष द्यावे. जिल्हा परिषदांमध्ये अशा तऱ्हेने सेवाजेष्ठता डावलून पदोन्नती दिल्याचे आढळून आल्यास जिल्हा परिषदेप्रमाणे विभागीय आयुक्त, कार्यालयातील संबंधित अधिकारी/ कर्मचा-यांची अशा प्रकरणी जबाबदारी निश्चित करण्यात यावी.

Chief Executive Officer
Zilla Parishad, Jalgaon

( मोहम्मद हुसेन मुजावर )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

जा.क्र . साप्रवि/रवका/आरआर/३८/२००८
सामान्य प्रशासन विभाग, जि.प.जळगांव.
दिनांक - १३/५/२००८

प्रत- मा.मु.का.अ./ म.अति.मु.का.अ. यांचे स्वीय सहायक जि.प.जळगांव यांना माहितीसाठी.
प्रत- अध्यक्ष महाराष्ट्र राज्य जि.प.कर्मचारी महासंघ / महाराष्ट्र राज्य जि.प.कर्मचारी युनियन महासंघ जिल्हा शाखा जळगांव यांना माहितीसाठी.
प्रत- अध्यक्ष, कास्ट्राईब कर्मचारी संघटना, जिल्हा शाखा, जळगांव.
<u>प्रत - माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना</u>
१) सर्व खातेप्रमुख, जि.प.जळगांव.
२) साप्रवि [illegible]
३) सर्व [illegible]

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद जळगांव.(क)

—११—

क्रमांक :- एपीटी-३६०४/ प्र.क्र.२६७८/आस्था-८
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
मंत्रालय, मुंबई :-४०० ०३२.
दिनांक :- ३० एप्रिल, २००४.

प्रति,

विभागीय आयुक्त,
अमरावती विभाग, अमरावती.

विषय :- जिल्हा परिषद जिल्हा सेवा/ जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग-३) मधील कर्मचा-यांची सेवा जेष्ठता यादी प्रसिध्दीबाबत तथा त्यांना महाराष्ट्र विकास सेवा वर्ग-२ मध्ये पदोन्नती देणेबाबत.

संदर्भ :- आपलेकडील पत्र क्र.विकास/ नविसे/ कवि/ ८७४/ ०४, दि.९ मार्च, २००४.

उपरोक्त विषयी आपण संदर्भाधीन पत्रान्वये खालील मुद्यांवर शासनाचे मार्गदर्शन मागितलेले आहे.

१ दिनांक २४ मे. १९९९ च्या राजपत्रात जे सुधारीत नियम प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्यांची अंमलबजावणी दि.२४.५.१९९९ पासूनच होणार असल्याने जे कर्मचारी सेवा प्रवेशोत्तर परिक्षा त्यापूर्वी उत्तीर्ण झालेले नाहीत त्यांची सेवा जेष्ठता बदलणार नाही. म्हणजेच जे विहित मुदतीत आणि संधीत सेवा प्रवेशोत्तर परिक्षा उत्तीर्ण झालेले आहेत त्यांना त्यांच्या संवर्गात इतरांपेक्षा वरचा क्रम मिळणार नाही का?

२ काही जिल्हा परिषदांनी काही कर्मचा-यांना ते कर्मचारी परिक्षा उत्तीर्ण नसतांना अथवा त्यांनी वयाची ४५ वर्षे पूर्ण करण्यापूर्वीच (सूट प्राप्त करण्यापूर्वी) त्यांना पदोन्नती दिलेले असेल अशा कर्मचा-यांच्या बाबतीत सेवा ज्येष्ठता ठरवितांना म्हणजेच पदोन्नती दिलेल्या संवर्गात आल्याची तारीख ठरवितांना ती कोणती मानावी किंवा निश्चित करावी?

३ काही कर्मचारी विहित मुदतीत वा संधीत सेवा प्रवेशोत्तर परिक्षा उत्तीर्ण झाले नसतील परंतु वयाची ४५ वर्ष पूर्ण होण्यापूर्वी केव्हातरी परिक्षा उत्तीर्ण केली असेल तर अशा कर्मचा-यांची सेवा ज्येष्ठता ठरवितांना त्यांनी ज्या वेळेस परिक्षा उत्तीर्ण केली असेल दिनांक धरावी का?

२. वरील मुद्याच्या अनुषंगाने शासनाच्या पत्र क्रमांक- अराप २००३/ प्र.क्र.३०५/ आस्था-९, दिनांक निरंक सप्टेंबर, २००३ अन्वये स्वयंस्पष्ट असे मार्गदर्शन दिलेले आहे. तरी देखील खालीलप्रमाणे स्पष्टीकरण करण्यात येत आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा सेवाप्रवेशोत्तर परीक्षा नियम १९८५ हे २० जानेवारी, १९८६ पासून अंमलात आलेले आहे. संबंधीत कर्मचा-याने सेवा प्रवेशोत्तर नियम लागू झाल्यापासून सदर नियमातील नियम ४ नुसार ही परीक्षा तीन संधीमध्ये व ४ वर्षांच्या कालावधीत उत्तीर्ण होणे आवश्यक होते. म्हणजेच त्यांनी २० जानेवारी, १९८६ पासून ४ वर्षांच्या कालावधीत म्हणजे दि.२० जानेवारी, १९९० पर्यंत परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक होते. परंतु सदर कर्मचारी परीक्षा उत्तीर्ण झालेला नसतान तसेच वयाची ४५ वर्ष पूर्ण केलेली नसताना त्यांना १९९२ पासून विस्तार अधिकारी या पदावर पदोन्नती दिलेली आहे ती चुकीची आहे. त्यांनी वयाची ४५ वर्ष दि.१५.७.१९९५ ला पूर्ण केलेली आहे. वयाची ४५ वर्षे ज्या दिनांकाला पूर्ण होईल अशा कर्मचा-यास परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्याची तरतूद म.जि.प.जि.से. सेवाप्रवेशोत्तर परीक्षा नियमावालीतील नियम ६ (१) मध्ये केलेली आहे. त्यामुळे "अ" या कर्मचा-यास दि.१५.७.१९९५ पासून सूट मिळालेली असल्यामुळे त्यांच्या लगतनंतरच्या दिनांकापासून पदोन्नती देणे आवश्यक आहे. आता या ठिकाणी त्यांना १९९२ पासूनच पदोन्नती दिलेली असल्यामुळे ती काढून न घेता त्यांची पदोन्नती पुढे चालू ठेवणे उचित राहील. मात्र त्यांना पुढील पदोन्नतीसाठी मिळणारी जेष्ठता ही त्यांनी वयाची ४५ वर्षे पूर्ण केल्याच्या लगतनंतरच्या दिनांकापासून निश्चित करावी लागेल.

३. दि.२० जानेवारी, १९८६ रोजी अधिसूचना निर्गमित झाल्यानंतर ज्यांनी सदर नियमातील नियम ४ नुसार सदर परीक्षा तीन संधीमध्ये व चार वर्षांच्या कालावधीत उत्तीर्ण झाले असतील आणि जे कर्मचारी वरील परि.३ मध्ये उल्लेखिलेल्या "अ" या कर्मचा-यास कनिष्ठ असतील परंतु "अ" या कर्मचा-यास सूट मिळण्याअगोदर विहित संधीत उत्तीर्ण झाले असतील असे कर्मचारी "अ" या कर्मचा-यास जेष्ठ ठरतील.

दुसरे आणखी असे की, कनिष्ठ कर्मचा-याची वेतन निश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम, १९९८ आणि शासन अधिसूचना वित्त विभाग क्रमांक - वेपूर-२२९८/प्र.क्र.१३/९८/सेवा-१०, दिनांक १० डिसेंबर १९९८ मधील नियम ७ मधील टीप ७ मधील तरतुदीनुसार जे कर्मचारी वरिष्ठ ठरलेले आहेत अशा प्रकरणात वरिष्ठ कर्मचा-यांचे वेतन त्यांच्या कनिष्ठ कर्मचा-याच्या निश्चित केलेल्या वेतनाच्या रकमेइतके वाढविणे आवश्यक आहे अशी वाढ करताना दोन्ही कर्मचारी एकाच संवर्गातील असावेत आणि ज्या पदावर त्यांना बढती देण्यात आली असेल ती पदे त्याच संवर्गात समरुप असावी.

ज्या कर्मचा-याविरुध्द शिस्तभंग विषयक कार्यवाही चालू असेल किंवा शिस्त अपील नियमाच्या तरतुदीनुसार विद्यमान वेतन श्रेणीमध्ये वरिष्ठ कर्मचारी कनिष्ठ कर्मचा-यापेक्षा कमी वेतन घेत असेल तर अशा प्रकरणी कनिष्ठ कर्मचा-याच्या वेतनाच्या रकमेइतके वेतन वाढविता येणार नाही.

सही/-

(स.ब.अडकमोल)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

—13—